# जिल्हा व सत्र न्यायालय, नांदेड.

## भरती प्रक्रिया – २०१८

### – उमेदवारांना सुचना –

| | |
|---|---|
| १) | लघुलेखक, लिपीक व शिपाई पदांच्या सर्व चाचण्यांचे / परिक्षेचे निकाल व भरती प्रक्रियेसंबंधी इतर सुचना जिल्हा न्यायालय, नांदेडच्या नोटीस बोर्डावर व परिक्षा केंद्रावर लावले जातील. तसेच जिल्हा न्यायालय, नांदेड चे संकेत स्थळ https://districts.ecourts.gov.in/nanded येथे देखील उपलब्ध राहतील. |
| २) | चाळणी परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची मराठी टंकलेखन परिक्षा संगणकावर MGM College of Engineering, Airport Road, Nanded येथे दिनांक ८ जुलै, २०१८ रोजी सकाळी ठिक ०९.०० ते दुपारी १२.०० या कालावधीत सोबत जोडलेल्या वेळापत्रकाप्रमाणे घेतली जाईल. तसेच सदर परिक्षेसाठी परिक्षार्थींना आवश्यक सुचना या सोबत जोडल्या असून सदर सुचनांचे काटेकोर पालन करणे परिक्षार्थींचे हिताचे राहिल. परिक्षार्थींनी वेळापत्रकानुसार आपल्या बॅचसाठी निर्धारित वेळेच्या अर्धा तास आधी परिक्षा केंद्रावर उपस्थित रहाणे अत्यावश्यक आहे. |
| ३) | मराठी टंकलखेन परिक्षेत उत्तीर्ण उमेदवारांची इंग्रजी टंकलेखन परिक्षा संगणकावर MGM College of Engineering, Airport Road, Nanded येथे दिनांक २२ जुलै, २०१८ रोजी घेतली जाईल. सदर परिक्षेचे वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येईल. |
| ४) | सर्व परिक्षा व चाचण्यासाठी उमेदवारांनी त्यांना देण्यात आलेले प्रवेशपत्र सोबत आणणे बंधनकारक आहे. त्या शिवाय त्यांना परिक्षेस बसू दिले जाणार नाही. |
| ५) | परिक्षा दालनात मोबाईल फोन आणि अथवा इतर इलेक्ट्रानिक उपकरणे आणण्यास प्रतिबंध आहे. आणल्यास / आढळल्यास परिक्षार्थीस परिक्षेत बसू दिले जाणार नाही. |

——X——

# टंकलेखन चाचणीसाठी सूचना

०१ स्थानीक भाषेतील वीस गुणांच्या टंकलेखन परिक्षेत उमेदवाराला संगणकावर दहा मिनीटात तीनशे शब्द टंकलिखीत करावे लागतील. (३० शब्द प्रति मिनीट).

०२ परिक्षार्थीनी दिलेला मजकूर ( Libre Office ) या वर्ड प्रोसेसरमध्ये टंकलिखीत करावयाचा आहे. अन्य कोणतेही वर्ड प्रोसेसर वापरण्यात येऊ नये.

०३ परिक्षार्थीनी वर्ड प्रोसेसर उघडताच त्यांना आपला आसन क्रमांक आणि डीसीआर क्रमांक नमूद करण्यासाठी निर्दिष्ट केलेली जागा दिसून येईल. परिक्षार्थीनी निर्दिष्ट जागीच आपला आसान क्रमांक व डीसीआर क्रमांक टाकणे आवश्यक आहे. तसेच मजकुर संपल्यानंतर परिक्षार्थीनी आपली सही करावी.

०४ **आसन क्रमांक व स्वाक्षरीशिवाय अन्य कोणतेही ओळखचिन्ह टाकण्यास सक्त मनाई आहे. असा काही प्रकार निदर्शनास आल्यास संबंधीतास चाचणीतून बाद करण्यात येईल.**

०५ परिक्षार्थीनी मजकूर टंकलिखीत करण्यासाठी कृतीदेव ०५५ हा फॉन्ट वापरणे आवश्यक आहे.

०६ फॉन्टचा आकार ( Font size ) हा १५ असणे आवश्यक आहे.

०७ कागदाचा आकार ( Paper size ) ए४ असणे आवश्यक आहे.

०८ डावीकडील समास दोन इंच किंवा तीन सेंटीमीटर असणे आवश्यक आहे.

०९ वरील, उजवीकडील आणि खालील समास एक इंच किंवा दीड सेंटीमीर असणे आवश्यक आहे.

०९ दोन ओळींतील अंतर ( Line Spacing ) १.५ असणे आवश्यक आहे.

१० टंकलिखीत मजकूर जस्टीफाईड ( Justified ) करणे आवश्यक आहे.

११ मजकूर टंकलिखीत झाल्यानंतर ( Print command ) देणे आवश्यक आहे.

१२ दिलेल्या मजकूराव्यतिरिक्त अन्य मजकूर किंवा मजकूर संपल्यानंतर पुन्हा तोच मजकूर टंकलिखीत करु नये. अतिरिक्त मजकूर दुर्लक्षीत करण्यात येईल.

——x——